# प्रकरण पहिले

## आत्मचरित्राचे स्वरुप - प्रेरणा व व्याख्या



# प्रकरण पहिले

# आत्मचरित्राचे स्वरूप – प्रेरणा व व्याख्या

ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।।

जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।

– संत ज्ञानेश्वर

श्री संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ' ज्ञानेश्वरी ' ग्रंथाच्या पहिल्याच ओवीत आत्मरूपाचे नमनात्मक वर्णन केलेले आहे. सर्वव्यापी, ओंकार आत्मरूपी अशा सत्‌चित्‌आनंद चैतन्यघन अशा परमात्म्याचे नमनात्मक वर्णन करताना संत ज्ञानेश्वरांनी 'आत्मरूपा' असा शब्द प्रयोग केला आहे. म्हणजे 'आत्मा' हा सर्वव्यापी आहे व 'रूपा' म्हणजे पाहणे, संशोधन करणे, शोधणे या व्यापक अर्थाने सांगितले आहे. त्याप्रमाणे आत्मचरित्रामध्येही आत्म्याकडे, स्वतःकडे पाहण्याची व संशोधन करून शोधण्याचीच प्रक्रिया आहे. म्हणूनच आत्मरूपा व आत्मचरित्र यामध्ये आंतरिक जिव्हाळ्याचा संबंध आहे. कारण आत्मारूपामध्ये आध्यात्मिक सत्याचे दर्शन असते तर आत्मचरित्रामध्ये व्यवहारिक सत्याचे दर्शन घडविलेले असते. प्राचीन मराठी संतवाङ्मयात आत्मरूपाचे वर्णन, आत्मचिंतन, आत्मनिवेदन, आत्मविकास व आत्मसंवाद या अर्थाने आंतरिक भावनेचा उफाळा संतानी भक्तीतून व्यक्त केला. त्याला भावनेचा व भक्तिरसाचा स्पर्श आहे. परंतू आर्वाचीन मराठी वाङ्मयात मराठी साहित्यातील जे स्वयंसिद्ध असणारे वाङ्मय प्रकार आहेत. त्यापैकीच 'आत्मचरित्र' हा एक संपूर्ण व स्वतंत्र असा वाङ्मयप्रकार मानण्याऐवजी चरित्र वाङ्मयाचाच एक उपप्रकार मानण्याकडे प्रवृत्ती होती. त्यामुळे टोकाकाराकडून आत्मचरित्रात्मक लेखनाची विशेष दखल घेतली गेली नव्हती. मराठी साहित्याकडे पाहताना आपणास लघुकथा, कादंबरी, नाटक, एकांकिका या सारखे अनेक साहित्यप्रकार जसे आढळून येतात त्याचप्रमाणे आत्मचरित्र हा ही एक साहित्यप्रकार आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. आत्मचरित्रास साहित्याचा स्वतंत्रप्रकार अलिकडच्या काळात गणला जाऊ लागला

याचे हे कारण असावे की प्राचीन काळी कलात्मक अशी आत्मचरित्रे फारच अभावाने आढळून येत होती. आधुनिक काळात स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानण्याइतपत दर्जेदार आत्मचरित्रे आपणास आढळून येत आहेत.

**१. आत्मचरित्र : एक स्वतंत्र वाड्.मय प्रकार**

'आत्मचरित्र' हा कादंबरी इतकाच लोकप्रिय आणि महत्त्वाचा असा वाड्.यमप्रकार आहे. आजपर्यंत चरित्र या वाड्मयमप्रकाराचे भावंड म्हणजे आत्मचरित्र, अशा समजुतीमुळे या वाड्.मय प्रकाराची मोठीच उपेक्षा झाली, वस्तुतः मानवी स्वभावाचे आणि जीवनदर्शनाचे सामर्थ्य सर्वात अधिक असणारा असा हा वाड्.मयप्रकार आहे. कादंबरीत कल्पित व्यक्ती ही लेखनाचा विषय बनते, चरित्रात लेखक प्रत्यक्षातल्या व्यक्तीला लेखनविषय होतो. आत्मचरित्र ही प्रत्यक्षात व्यक्तीने सांगितलेली आपली जीवनकहाणी असते. वास्तवचा तिला भरभक्कम पाया असतो. आत्मचरित्रातील आत्मतत्त्व हे लेखकाच्या आंतरिक आणि बाह्य जीवनाशी असलेले नाते येथे अविष्काररूप धारण करते. दैनंदिनी, पत्रे, स्मरणिका, आठवणी, प्रवासचित्रण, लघुनिबंध इत्यादींसारखे लेखनप्रकारही आत्माविष्कारयुक्तच असतात. पण त्यातील आत्माविष्काराला आत्मचरित्राइतका पैस, मोकळा नसतो. इतर वाड्मयाप्रकारापेक्षा काही आगळे चैतन्य आत्मचरित्रात जाणवते. वाचकाला हा जो जिवंतपणाचा अनुभव आत्मचरित्रात येतो, तो लेखकाच्या व्यक्तिगत गुणांमुळेच. आपल्या जीवनानुभवातून हाती आलेले परिमित का होईना पण निर्मळ सत्य आत्मचरित्रकार आपल्या लेखाव्दारे प्रकट करीत असतो. स्वतःविषयी लिहिताना तो लपवाछपवी करीत नाही की अतिशयोक्ती होऊ देत नाही. अर्थात अशी पथ्ये सांभाळून स्वतःच स्वतःची कहाणी सांगणे, ही वाटते तितकी सोपी गोष्ट नसते. त्यासाठी तटस्थपणे स्वतःकडे पाहण्याची साधना लेखकाला करावी लागते. सत्यनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा घ्यावी लागते. या गुणवैशिट्यांमुळे तर आत्मचरित्राचे मोल अधिकच वाढते. लेखकाच्या व्यक्तिमत्व दर्शनामुळे जीवनानुभवाचे नवेच दालन आपल्यापुढे खुले होत असते. त्यात लालित्य सहजपणे अवतरते. म्हणून एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार या दृष्टीने आत्मचरित्राचा विचार करणे गरजेचे आहे.

साहित्य आणि समाज ह्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपल्याला साहित्यातून समाजदर्शन घडताना दिसते व समाजामुळे साहित्य निर्मिती होते असे वाटते कारण साहित्य हे मानवी जीवनाचे एक महत्त्वाचे अंग आहे. मनुष्य जस जसा बुद्धिमान व विचारवंत होत गेला तसतसा तो सामाजिक जीवनाशी अधिकाधिक एकरूप होत गेला. त्यातूनच तो आपले विचार दुसऱ्या व्यक्तिसमोर प्रगट करू लागला. अशा प्रकारच्या प्रगटीकरणाच्या प्रगतीतून आपले विचार, भावना, कल्पना, केवळ व्यक्त करण्यापेक्षा या उत्कटत्वाने व सौंदर्यपूर्ण रीतीने व्यक्त केल्यानंतर त्याचा परिणाम अधिक होतो आणि त्याचा प्रभावही पडतो ही जाणीव झाल्यावर मानवी जीवनात कलाजिवनाचे बीजारोपन झाले. त्यातून मनुष्य अधिकाधिक प्रगतिशील होताना तो संस्कृतीमय झाला आणि कलाही त्याच्या सांस्कृतीत जीवनाची एक महत्त्वाची फळश्रुती ठरली.

साहित्यात जीवनानुभवांचा आविष्कार असतो, त्याप्रमाणे जीवनभाष्यही असते. आपल्याला आलेल्या विविध अनुभवांचा आविष्कार करता करता अनाकलनीय, व्यामिश्र व गुंतागुंतीच्या असलेल्या जीवनाचे स्वरूपही स्पष्ट करावे, अशी साहित्यकारांची अपेक्षा असते. त्यातूनच सर्व प्रकारच्या साहित्यकृतींचा उगम झाला आहे. कथा, कांदबरी, नाट्य, काव्य, या सर्वांच्या मुळाशी लेखकाची जीवनानुभुती असते. अर्थात आपले जीवनानुभव प्रत्येकजण वेगवेगळया पध्दतीने व्यक्त करत असतो. सामान्यतः त्या बाबतीत आपणास दोन प्रवृत्ती दिसतात.

१) वस्तुनिष्ठ चित्रण – स्वतःला अलिप्त ठेवून इतरांचे अनुभव व्यक्त करणे.

२) आत्मनिष्ठ चित्रण स्वतःचे किंवा इतरांचे अनुभव स्वतःच्या अनुभवाच्या आधारे चित्रित करणे. वास्तविक पाहता या प्रवृत्ती केवळ साहित्यकाराच्या नसून त्या मानवी प्रवृत्तीच आहेत. मानसशास्त्राने त्र्दजतवअमतजत्र अंर्तमुख व त्र्गजतवअमतजत्र बर्हिमुख या शब्दात या प्रवृत्तींचे वर्णन केले आहे. या प्रवृत्ती साहित्यकारांच्या ठिकाणीही आढळतात. त्यातील आत्मनिष्ठ प्रवृत्तीतून जे वाङ्मय प्रकार निर्माण झाले आहेत. त्यात आत्मनिष्ठेचीच कसोटी लावायची झाली तर 'आत्मचरित्राला पहिले स्थान द्यावे लागेल

कारण कोणत्याही वाङ्मयप्रकारामध्ये सत्य असले तरी त्या सत्याचा कलात्मक कल्पनाविलासात्मक, सौंदर्यात्मक, आविष्कार झालेला असतो. म्हणजेच साहित्यात केवळ सत्य नसून सत्याभास असतो. परंतु आत्मचरित्रात सत्याभासाला स्थान नसून केवळ सत्यालाच महत्त्व असते. जीवनाचे यर्थाथ चित्रण ही तर त्याची मूळ प्रेरणा. आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीचा इतिहास होय, त्यामुळे इतिहासातील सत्याप्रमाणे त्याचे स्वरूप असते. आत्मचरित्राला ललिकृती म्हणण्याऐवजी ऐतिहासिक कृती म्हणावे काय ? असा प्रश्न निर्माण होतो. पण दोहोत फरक आहे. कारण इतिहासकार घटनांपासून अलिप्त असतो. तसा आत्मचरित्रकार अलिप्त असत नाही. आत्माविष्कार ही इतिहासाची प्रेरणा नसून ललित वाङ्मयाची प्रेरणा आहे. म्हणून आत्मचरित्राला ललित कृती असेच म्हणणे योग्य ठरेल.

आत्मचरित्रात घटनांचे कलात्मक चित्रण असते. आत्मचरित्र लिहणाऱ्या लेखकाच्या भावना, कल्पना, विकार, भाषाशैली यांचा त्या लेखनास स्पर्श झालेला असल्याने आत्मचरित्राचे स्वरूप कथा कादंबरीसारखे मनोरंजक बनलेले असते. आत्मचत्रित कल्पनाविलासात्मक वर्णन नसते. तसेच इतिहासाप्रमाणे घटनांचा केवळ रुक्ष तपशीलही नसतो. इतिहासाची सत्यनिष्ठता व कथावाङ्मयाची मनोरंजकता यांचा त्यात मिलाफ झालेला असतो. म्हणून आत्मचरित्र हे एकाचवेळी इतिहास आणि कादंबरीही असते. अर्थात आत्मचरित्रकाराने कोणत्या भूमिकेतून आत्मचरित्र लिहिले आहे, यावरही त्याची कलात्मकता अवलंबून असते. परंतु बहुधा आत्मचरित्राची प्रकृती ही ललितवाङ्मयाच्या प्रकृतीशी जुळणारी असल्याने एक ललितकृतीच म्हणूनच तीचा विचार करणे योग्य ठरते. परंतु ही ललितकृती कथा, कादंबरी, कविता, नाट्य या वाङ्मयाप्रमाणे तंत्रनिष्ठ असत नाही. 'आत्मचरित्र' हा एक मुक्त वाङ्मय प्रकार आहे. आत्मचरित्राचे विशिष्ट्य असे तंत्र नसल्याने प्रत्येक आत्मचरित्र दुसऱ्या आत्मचरित्रापेक्षा वेगळे आढळते. प्रत्येकाचे आयुष्य हे एखाद्या कादंबरीप्रमाणेच विविध भावपूर्ण घटनांनी ओथंबलेले असते. अगदी रुक्ष, एकमार्गी आणि नीरस, लालित्याचा किंचितही स्पर्श न झालेले असे मानवी जीवन संभवू शकत नाही. याचे कारण प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीहून अनेक अर्थाने भिन्न असते. प्रत्येक व्यक्तीच्या ठायी जीवन नावाचे तत्त्व एकच असले तरी

नाना प्रकारची चित्रविचित्र रसायने त्या जीवनात सृष्टीने मिसळलेली असतात. रूसोचे 'कन्फेक्शन्स' आणि आपल्याकडील वि. रा. शिंदे यांचे ' माझ्या आठवणी आणि अनुभव' ही आत्मचरित्रे तुलनेसाठी घेतली तर असे जाणवते, की देश, काल, परिस्थिती, सामाजिक दृष्टी, वृत्ती, जीवनविषयक विचार, या सर्व बाबतीत कमालीची भिन्नता आढळून येते. मानवी जीवनालाच येथे विशिष्ट आकार नाही तेथे त्यांच्या चित्रणाला तरी विशिष्ट आकारात आणि तंत्रात कसे बांधता येईल? म्हणून अशा वाङ्मयकृतीची समीक्षा ही तंत्रनिष्ठ करण्यापेक्षा आस्वादनिष्ठ करणे योग्य ठरेल.

## २) आत्मचरित्र संज्ञासंकल्पना :

प्राचीन भारतीय साहित्यात किंवा मध्ययुगात 'आत्मचरित्र' ही वाङ्मयीन संकल्पना भारतीय साहित्यात नव्हती. मात्र 'चरित्र' किंवा 'चरित' ही संकल्पना रूढ होती. संस्कृत भाषेत 'हर्षचरित', 'रामचरित', असे शब्दप्रयोग आहेत, ग्रंथही आहेत. आत्मचरित्र किंवा 'आत्मचरित' असे शब्दप्रयोग मात्र नाहीत. त्याकाळात स्वतःविषयीची किरकोळ किंवा जुजबी स्वरूपाची आवश्यक ती माहिती व्यक्तींनी विशेषतः ग्रंथकारांनी कारणपरत्वे दिलेली असते. पण त्या माहितीला 'आत्मचरित्राची' योग्यता नव्हती. ती माहिती देण्याचा हेतूही 'आत्मचरित्र' लिहिण्याचा नव्हता.

असे असले तरी 'आत्मशोध' ही संकल्पना भारतीय संस्कृतीत आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात प्राचीन युगापासून आहे. 'आत्मन्' या शब्दापासून 'आत्म' हे विशेषण आणि 'आत्मा' हे नाम संस्कृतमधून आलेले आणि मराठी भाषेत रूढ झालेले आहे. 'आत्मशोध' म्हणजे स्वतःचा शोध, 'स्व' चा शोध असा त्याचा अर्थ होतो. भारतीय तत्त्वज्ञानात मूलभूत काही प्रश्न आहेत. त्यात 'कोऽहम्', मी कोण आहे, हा एक प्रश्न असून त्याचे उत्तर 'सोऽहम्', म्हणजे 'तो' मी आहे असे आहे. तो म्हणजे 'परमेश्वर' ही संकल्पना तत्त्वज्ञानातील आहे, धर्मातील नव्हे. धर्मातील परमेश्वर वेगळा आणि भारतीय तत्त्वज्ञानातील चित्स्वरूप, ज्ञानात्मक, परमेश्वर वेगळा आहे. तो वेगळा कसा आहे, याची मीमांसा तत्त्वज्ञानात मिळते. इथे ती मीमांसा प्रस्तुत नाही. आपला प्रस्तुत मुद्दा असा आहे की, भारतीय तत्त्वज्ञानात 'आत्मशोधाचीच'

संकल्पना असून तात्त्विक पातळीवर 'मी' चा शोध प्राचीन काळापासून घेतला जातो आहे. ही मीमांसा तत्त्वज्ञानात्मक  किंवा आध्यात्मिक स्वरूपाचे असते. ती 'मी' च्या भौतिक स्वरूपाची नसते. 'आत्मचरित्र' या आधुनिक साहित्य प्रकारात 'आत्मशोधाची' ही संकल्पना आहे ती भौतिक पातळीवरची आहे. ती 'आधुनिक' मानवाची भौतिक पातळी आहे, हेही इथे नीटपणे लक्षात ठेवण्याची गरज आहे.

'आत्मचरित्र' या शब्दामधील 'चरित्र' हे नाम संस्कृत 'चर्' धातूपासून तयार झालेले दिसते. याच धातूपासून 'चरित्' हा शब्दही तयार झालेला आहे. तो 'चरित्र' या नामाऐवजी, त्याचअर्थाचे नाम म्हणूनही वापरला जातो. 'चर्' 'चरति' म्हणजे चलणे, चालणे, पुढे जाणे, चालत राहणे, 'चरित्' चा अर्थ चललेला, चाललेला असा होतो. ते नाम म्हणून घेतले तर 'चाललेले अंतर, चाललेली स्थितिगती, चालेल्या स्थितिगतीचा आलेख किंवा नकाशा असा अर्थ लक्षणेने घेता येतो'.  'आत्मचरित्' किंवा 'आत्मचरित्र' याचा वाङ्मयीन क्षेत्रातील अर्थ 'मी माणूस या नात्याने माझ्या जीवनात जी काही आजवर वाटचाल केली त्या वाटचालीतील माझी स्थितिगती म्हणजे सुखदुःखे, आशाआकांक्षा, विकास – विस्तार, भावसत्ये, कृतिकर्मे आणि या सर्वातील यशापयश, धडपड यांचा 'मी' केंद्रस्थानी धरून काढलेला आलेख किंवा नकाशा असा सर्वसाधारणपणे होतो. ऑटोबायोग्राफी' या इंग्रजी शब्दाचा अर्थही 'स्वतःच स्वतःच्या जीवनाचा काढेलेला आलेख ' असा होतो. या शब्दाला प्रतिशब्द म्हणूनच 'आत्मचरित्र' हा शब्द मराठी वाङ्मयात रूढ झालेला आहे.

मराठी वाङ्मयात 'आत्मचरित्र' हाच शब्द रूढ झाला, 'स्व–चरित्र' हा शब्द रूढ झाला नाही हे एक बरेच झाले. 'स्व' म्हणजे स्वतः आणि 'आत्म' म्हणजेही स्वतः असाच अर्थ होतो. पण 'आत्म' या विशेषणाला भारतीय संस्कृतीचा एक खास संदर्भ आहे तो 'स्व' याला जाणवत नाही. 'आत्मन्' या शब्दापासून 'आत्म' आणि 'आत्मा' हे शब्द तयार झाले असल्याने 'आत्म' या विशेषणाला 'आत्मा' या शब्दाचा (नामाचा) सतत मानसिक पातळीवर संदर्भ राहतो. आधुनिक बौद्धिक मीमांसेच्या संदर्भाने 'आत्मा म्हणजे स्वतःच्या ठायी असलेला सद्सदविवेक किंवा विवेक – शक्ती असा अर्थ होतो. जिवंत व्यक्तीच्या अंतर्यामी राहून तिच्या सर्व जीवनव्यापारांचे नियंत्रण करणारी देहभिन्न सूक्ष्म सद्वस्तू व्यक्तीच्या

अनुभवांना आश्रयभूत असणारे स्थिर द्रव्य, भिन्न अनुभवांतील ऐक्य संपादण्याचे कार्य करणारी शक्ती, असा 'आत्मा' या शब्दाचा अर्थ होतो. हा संदर्भ 'आत्म' या शब्दाला सतत चिकटून असतो. 'चरित्र' या शब्दापासून 'चारित्र्य' हा शब्द तयार होतो. या शब्दाला नैतिकतेचा अर्थसंदर्भ आहे. त्यामुळे 'चरित्र' शब्दाबरोबरच मनात 'चारित्र्य' हा शब्दही आठवतो. त्याचा नैतिक संदर्भ चरित्र या शब्दाला चिकटतो.

त्यामुळे ' आत्मचरित्र' या शब्दाच्या उच्चाराबरोबर जाणिवेच्या आणि अर्धजाणिवेच्या पातळीवर त्या शब्दांचे वाच्यार्थ, लक्षार्थ, व्यंग्यार्थ आणि संदर्भार्थ आठवून तो 'आत्मचरित्र' या शब्दाचा एक व्यापक अर्थ लक्षात येतो. तो खूप काही सुचवतो. माझ्या मते 'आटोबायोग्राफी' या इंग्रजी शब्दाच्या अर्थापेक्षा हा अर्थ अधिक व्यापक आहे. या शब्दार्थाला भारतीय संस्कृतीचा, भारतीय मनाचा, भारतीय तत्त्वज्ञानाचा संदर्भ आहे. म्हणून 'स्व चरित्रा' ऐवजी 'आत्मचरित्र' हा शब्द झाला. 'आधुनिक युग' भारतात ब्रिटीश राजवटीत उदयाला आले तरी ते खरे पाश्चात्य आधुनिक 'युग' नाही. भारतात उदयाला आलेली आधुनिकता ही भारतीय आधुनिकता आहे. तिला भारतीय समाज, संस्कृती, तत्त्वज्ञान आणि जीवनमुल्ये यांचा संदर्भ आहे. त्यातून ती जन्माला आलेली आहे. त्यामुळे पाश्चात्य आधुनिक समाजातील 'ऑटोबायोग्राफीज्' जशा असतील तशी भारतीय 'आत्मचरित्रे' असतीलच असे नाही.

### ३) पाश्चात्य आणि भारतीय आत्मचरित्रातील फरक

पाश्चात्य आत्मचरित्रे आणि भारतीय आत्मचरित्रे यांत एक मूलभूत फरक दिसतो. उदाहरणार्थ, पाश्चात्य आत्मचरित्रामध्ये 'मी' च्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यातील बारीक सारीक पापुद्रयांचा शोध घेतला जातो. हे पापुद्रे म्हणजे लहानपणीचे 'मी' चे खेळ, त्याची स्वप्ने, सवयी, त्यांचे आजार – रोग, आई, वडील, बहीण, भाऊ, मित्र यांच्याशी त्यांचे वर्तन इत्यादींचा अभ्यास करून त्यांचा पुढील जीवनावर काय परिणाम होऊ शकतो हे सांगण्याचा 'मी' कडून प्रयत्न केला जातो.

सामान्यतः पाश्यचात्य आत्मचरित्रे व्यक्तीच्या मनाचा तिच्या स्वभावाचा, तिच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यात विशेष रमातात. व्यक्तीला व्यक्ती म्हणून तिच्या वैशिष्टयांच्या अंगांनी समजून घेणे, शोधणे

यातच आत्मचरित्राचे ध्येय आहे, असे पाश्चात्यांना वाटते. युरोपीय समाजात व्यक्तीला आणि व्यक्ति स्वातंत्र्याला मोठी प्रतिष्ठा असते. तिचा व्यक्ती म्हणून समाजातील विकास हेच व्यक्तीचे ध्येय व्यक्ती समजते. व्यक्तीला लहानपणापासून त्याच्या आईवडिलांकडूनही तशाच प्रकारची वागणूक मिळते. तिच्या स्वतंत्र, अलग राहण्या व वागण्याला त्यांकडून मान्यताही मिळते.

भारतीय समाजात व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. आधुनिक युगाचे संस्कार झालेले असले, काही प्रमाणात परिवर्तन झालेले असले, तरीही भारतीय माणूस हा पाश्चात्य माणसापेक्षा वेगळा आहे. त्यामुळे पाश्चात्य पद्धतीची आत्मचरित्रे आपल्या भारतीय मानसिकतेला काही मर्यादांच्या पलिकडे मानवत नाहीत.

पाश्चात्य आत्मचरित्रांत व्यक्तिवैशिष्ट्यांविषयी भरपूर मजकूर असतो. पण व्यक्तीला व्यापक सामाजिक, कौटुंबिक सांस्कृतिक मूल्यात्मता नसते, असे दिसून येते. अर्थात तो मर्यादित स्वरूपात असतो. मर्यादित असला तरच तो ठीक वाटतो. अन्यथा तो आत्मकेंद्री 'मी' चे लाड आणि कोडकौतुक करणारा वाटतो. व्यक्तीला तो व्यापक पातळीवर नेऊ शकत नाही. परिणामी तो पसरट, पाल्हाळिक किंवा अनावश्यक वाटतो. ज्या व्यक्तिवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकावयाचा ती वैशिष्ट्ये जर समाज जीवनात कोणत्याही कारणाने महत्त्वाची अर्थपूर्ण वाटत असतील तर त्यांना मान्यता मिळते. केवळ व्यक्तीची वैशिष्ट्ये, केवळ तिचे वेगळेपण समजून घेण्यात मराठी, भारतीय मनाला रस वाटत नाही.

भारतात आधुनिक युगातही सुजाण व्यक्तीला आपले घर, कुटुंब समाज, संस्कृती, ध्येय,देश यांच्यासाठी आपले जीवन खर्ची घालावे, त्यामुळे तिचे सार्थक होते, असे वाटते. केवळ स्वतःसाठी सगळे जीवन वेचण्यात तिला 'पुरुषार्थ' वाटत नाही. त्यामुळे भारतीय आत्मचरित्रे वेगळी वाटतात.याचा सखोल परांमसर्श प्राचीन मराठी साहित्यातील संतांच्या साहित्यात आपल्यात येतो. संतानी स्वतःकरिता काहीही स्वार्थ न साधता केवळ .

" जगाच्या कल्याणा संताच्या विभूती ।

देह कष्टवीती । परउपकारे ।।"

या हेतूनचे संतानी आपले साहित्य लेखन केले आहे त्याच प्रमाणे संतांनी मोक्ष प्राप्ती करीता परमेश्वरापुढे भक्तिभावनेने आपले साहित्य हे आत्मनिवेदनात्मक मांडले आहे. त्यातूनच त्यांच्या आत्मनिष्ठ भक्तीचा प्रकाश सर्वत्र परसलेला आहे. त्याच्या साहित्यातून तो प्रकाश प्रगट झालेला आहे. म्हणून प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीचाच विचार आत्मचरित्रातून झालेला आहे. म्हणून भारतीय आत्मचरित्र वेगळी वाटतात.

पाश्च्यात्य आत्मचरित्रात व्यक्तिनिष्ठ गुणदोषांची चर्चा विशेष जाणवते. प्रमादांची चर्चा नसेल तर ती आत्मचरित्रे पाश्च्यात्यांना अपूरी वाटतात. तशी त्यांची मनोमन धारणा होते.

मराठी भारतीय आत्मचरित्रांत व्यक्मित्त्वाच्या किंवा व्यक्तिवैशिट्यांच्या गुणदोषांपेक्षा, प्रमादांपेक्षा तिच्या कार्यावर वाचकांची नजर विशेष खिळते. घर, कुटुंब, समाज, संस्कृती, ध्येय, देश यांच्यासाठी व्यक्तीने केलेल्या कार्यावर व वर्तनावर मराठी आत्मचरित्राचे व तिच्यातील व्यक्तीचे मोल ठरविते.

आत्मचरित्राचे लेखन करणाऱ्या मराठी मनालाही हीच प्रेरणा विशेष भावते. त्यामुळे पाश्चात्य आणि भारतीय आत्म–चरित्र–लेखनाची ध्येयेही भिन्न भिन्न वाटतात. पाश्चात्य आत्मचरित्रे प्रामुख्याने भौतिकवादी आणि भारतीय आत्मचरित्रे आत्मिकवादी (काहीशी आध्यात्मिकतेकडे झुकणारी, कार्याला महत्त्व देणारी, त्यागमय, सोशीक, सहिष्णू जीवनाकडे वळणारी,) वाटतात. पाश्चात्यसमाजाचा मूलभूत घटक हा 'व्यक्ती' 'घटक' हा मानला जातो. आणि भारतीय समाजाचा मूलभुत घटक 'कुटुंब' हा मानला जातो. त्यामुळे पाश्चात्य समाजव्यवस्थेत व्यक्ती स्वतःसाठी काय करते याला प्रतिष्ठा मिळते. आणि भारतीय समाजव्यवस्थेत व्यक्ती कुटुंबासाठी काय करते यावर तिची प्रतिष्ठा प्रथम जोखली जाते. दोन संस्कृतींमधील हा भेद आहे. आत्मचरित्र हे अंतिमतः त्या त्या समाजाच्या संस्कृतीचे प्रतिबिंब असते. म्हणून ही भिन्नता आत्मचरित्रांच्या प्रेणांतही दिसते.

### ४) आत्मचरित्राची ध्येये :–

#### ४.१) आत्माविष्कार :–

आत्माविष्काराची प्रवृत्ती माणासाच्या ठिकाणी सर्वत्र असून ती मूलभूत अशी प्रवृत्ती आहे. आत्माविष्करण (Self Expression) आणि आत्मप्रगटीकरण (Self Revealation) हा माणसाचा स्थायी भाव आहे. अगदी कल्पनारम्य वाङ्मयातही आत्मप्रगटीकरण नाही, असे होत नाही. आत्मचरित्र हा आत्माविष्काराला आणि आत्मप्रगटीकरणाला अत्यंत अनुरूप आणि पूरक असा वाङ्मयप्रकार आहे. या वृत्तीतून असंख्य आत्मचरित्रांची निर्मिती झाली आणि होत आहे. असे असले, तरी त्यापैकी फार थोड्यांनाच साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त होते. हा वाङ्मयप्रकार यशस्वीपणे हाताळण्यासाठी लेखकाच्या अंगी कलात्मक गुणांची तर आवश्यकता असतेच पण त्यासोबत खोटा विनय सोडून वस्तुनिष्ठ आत्मपरिक्षणाचीही गरज असते.

#### ४.२) स्वतःचे भान आणि स्वतःचा विसर :–

आत्मचरित्राचा लेखक आणि विषय हा एकच असल्यामुळे लेखकाला आपल्या व्यक्तित्त्वाकडे तटस्थ, दूरस्थपणे टीकात्मक दृष्टीने पाहता आले पाहिजे. त्यांने स्वतःला विसरलेही पाहिजे आणि त्याला स्वतःचे भानही असले पाहिजे अशा दोन परस्पर विरोधी गोष्टींची त्याला सांगड घालता यायला हवी हेच या वाङ्मयप्रकारास आवश्यक असणारे मोठे कौशल्य आहे. त्याविषयी एका टीकाकाराने पुढील उद्‍गार काढले आहेत. )" It is this peculir nature of this form of art which makes it unique among all forms of literary art".

#### ४.३) कठोर आत्मपरीक्षण :–

कठोर आत्मपरीक्षण हे आत्मचरित्राचे फार महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या दिव्यातून जाणे कठीण असल्यामुळेच फारसे लेखक या वाङ्मय प्रकाराच्या वाटेला जात नाहीत. आणि या कठोर आत्मपरीक्षणामुळेच सत्य आणि कलात्मक आत्मचरित्र कितपत लिहिले जाईल अशी भीती आंद्रेमोर्वा यांना वाटते. 'आत्मचरित्रनिवेदन

म्हणजे तारेवरची कसरत– आत्मश्लाघेचा व आत्मसमर्थनाचा आपल्यावर आरोप येणार नाही याबद्दल पदोपदी दक्षता बाळगावयाची आणि त्याचबरोबर जास्तीत जास्त अलिप्तवृत्ती स्वीकारून आपल्या स्वभाव विशेषांचे, गुणदोषांचे आणि कर्तृत्वाचे यथातथ्य दर्शन घडवून देण्याची खटपट करावयाची, असे दुहेरी धोरण आत्मचरित्रकाराला सांभाळावे लागते' , असे अ. ना. देशपांडे म्हणतात.

स्वतः लेखकच आत्मचरित्राचा विषय असतो. कलावंत सूर्याखालचे सगळे काही अगदी स्पष्टपणे पाहू शकतो आणि त्याचे तितकेच प्रामाणिक वर्णनही करू शकतो. पण स्वतःविषय काही सांगायची पाळी आली की, आत्मप्रेमाच्या भावनेमुळे तो आंधळा होतो. अशावेळी स्वतःविषयी प्रगट सत्य तो सांगू शकेलच असे नाही. उलट त्याची आत्मविषयक भावना प्रबळ होण्याची शक्यता आहे.

## ४.४) लेखकाची कसरत :–

प्रत्येक मानवी कृतीचा जन्म माणसाच्या आत्मविषयक जाणिवेतून होत असतो. या जाणिवेला आणि स्वतःला विसरून स्वतःकडेच तटस्थपणे पाहत गतजीवनातील स्मृती आठवणे आणि त्याचवेळी त्याचे कलात्मक लेखनही करणे ही गोष्ट बरीचशी कठीण आहे. असे परस्पर विरोधी गुण एकाच व्यक्तीच्या ठिकाणी असण्यासाठी त्या लेखकाजवळ काही वेगळ्याच सामर्थ्याची आवश्यकता असते. सत्याला सामोरे जाणे म्हणावे तितके सोपे नसते. जर कोणताही कलाप्रकार सत्याचे परिणामकारक दर्शन घडवू शकतो हे मान्य केले तर आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार या दृष्टीने सर्वात समर्थ वाङ्मयप्रकार आहे हे मान्य करावे लागते.

## ४.५) मानवी व्यक्तिमत्त्वाचा शोध :–

मानवी व्यक्तित्त्वाचा शोध घेण्यासाठी आत्मचरित्राचा विविधांगी उपयोग होऊ शकतो याची जाणीव आजच्या कलावंतांना होऊ लागली आहे. "माणसाविषयीच्या" आपल्या ज्ञानात, समजुतीत, आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार फार मोठी भर घालणारा आहे. कारण विविधांगी अशा मानवी स्वभावाचे

दर्शन घडविणे हाच मुळी त्याचा हेतू आहे," माणसाच्या विचारकर्तृत्त्वासोबतच या वाङ्मयप्रकाराची वाढ होत जाते. त्यामुळे आत्मचरित्र लेखनाचे निरनिराळे प्रयत्न म्हणजे साहित्याच्या कक्षा वाढविण्याचा प्रयत्न करणेच होय. आत्मचरित्राचा अभ्यास हा प्रामुख्याने मानवी मनाशी आणि मानवी व्यक्तित्त्वाशी निगडीत असल्याने तत्त्वचिंतनात्मक आणि मानसंशास्त्रीय ग्रंथांची मदत घेणेही या अभ्यासास आवश्यक ठरते. आत्मचरित्र ही जशी एका व्यक्तीने सांगितलेली स्वजीवनाची कहाणी आहे तशी ती मानवी मनाची, स्वभावाचीही साक्ष आहे.

**४.६) लेखक कालखंडाचा साक्षीदार :-**

' एखाद्या कलाखंडाचा साक्षी म्हणूनही आत्मवृत्त उपयोगी ठरू शकते' अर्थात त्यालाही काही मर्यादा आहेत. बाबा पद्मनजी यांच्या 'अरुणोदया' तून किंवा दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या आत्मचरित्रातून तत्कालीन सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक, वातावरणाची किती तरी माहिती आपणास मिळते.

"आत्मचरित्रातून एखाद्या साहित्यिकाच्या साहित्यकृतीचा अन्वय आणि आकलन आधिक सुलभ होऊ शकते. हिराबाई पेडणेकराशी परिचय झाल्यापासून आपल्या सौंदर्याभिरुचीचे पोषण होऊ लागले आणि त्याचा परिणाम आपल्या पुढील साहित्यकृतीवर झाला असे कोल्हाटकर आपल्या 'आत्मवृत्तात ' म्हणतात, अशा रीतीने एखाद्या लेखकाच्या अभ्यासाला त्याचे आत्मचरित्र बरेच उपयोगी ठरते.

आत्माविषकार आणि आत्मप्रगटीकरण ही माणसाची स्वाभाविक वृत्ती आहे. कवितेप्रमाणेच लघुकथा, कादंबरी, नाटक या सारख्या वाङ्मयप्रकारातूनही लेखकाचा सूप्तरूपाने का होईना पण आत्माविष्कार होतच असतो. असा कोणताही वाङ्मयप्रकार नाही ज्यामधून लेखकाचा आत्मविष्कार यांना त्या प्रकारे होत नाही. लेखकाने कितीही वास्तुनिष्ठ आणि तटस्थ, वृत्तीने लेखन केले तरी त्यात वैयक्तिक उल्लेख, संदर्भ यांचे अप्रत्यक्ष आविष्करण येणारच, म्हणजे त्यात काही अंशी का होईना पण आत्मचरित्रात्मकता असते. ललित वाङ्मयाच्या ठिकाणी असणारा हा महत्त्वाचा गुण आहे. या गुणामुळेच माणसाची

साहित्याबद्दलची ओढ वाढत असते. शेक्सपिअरच्या नाटकातील तंत्रापेक्षा आणि त्याने केलेल्या प्रयोगांपेक्षाही नाटकात व्यक्त झालेल्या त्याच्या व्यक्तित्वाचा शोध अभ्यासकांना अधिक महत्वाचा वाटतो. 'पॅरेडाइज लॉस्ट' चे रसिकांना असणारे आकर्षण ते केवळ महाकाव्य असल्यामुळे नाही तर मिल्टनच्या व्यक्तित्त्वाने ते काव्य भारले गेल्यामुळे आहे. 'गलिव्हर्स ट्रॅव्हल' मध्ये आपणास रस वाटतो. तो ते प्रवासवर्णन वाचताना स्विफ्टचे मनोदर्शन घडते म्हणून !

**४.७) मानवी स्वभावाचे दर्शनः–**

मानवी स्वभावाविषयी (Human Character) विलक्षण कुतूहल आणि उत्कंठा माणसाच्या मसनात सतत असते. तिची तृप्ती कथा, कादंबरी, नाटक, यांच्या वाचनाने काही अंशी होत असते. पण ती आत्मचरित्राच्या वाचनाने निश्चितच आधिक होते.

''कारण वास्तव जीवन जगलेल्या आपल्यासारख्या हाडामांसाच्या माणसाची, त्याने स्वतः सांगितलेली ती जीवनकथा असते. तिचे रंगरूप अस्सल असते. त्याला काल्पनिकतेचा स्पर्शही नसतो. यामुळे 'आत्मचरित्रवाचनातून मानवी स्वभाव आणि अनुभव यांच्यापर्यंत पोहोचण्याचा नवा अनुभव वाचकाला मिळत असतो. आत्मचरित्राच्या गुणवैशिट्यांविषयी 'Art of Autobiography' या ग्रंथात डॉ. नाईक म्हणतात.

" It gives the reader a sense of sharing in actual human experience it offers scope to estimate and judge it at the same time. There is an opportunity of coming in touch with living persons, not with legendry figures, of realising that each character, each

destiny is moulded by influence of heridity. environment and circumstances out side individual control." म्हणूनच लेखकाच्या व्यक्तित्वाच्या अंतरंगाचा आविष्कार हे आत्मचरित्राचे मुख्य ध्येय समजले जाते.

**५) आत्मचरित्राचे स्वरूप विशेषः–**

**५.१) सत्यदर्शन :–**

आत्मचरित्र ही जीवनकथा असते. लेखकाच्या जीवनात ज्या ज्या घटना घडलेल्या असतात. त्या घटनांचे त्याने विनेदन केलेले असते. एका दृष्टीने स्वतः लेखक हाच त्या जीवनकथेचा नाट्य असतो. त्या नायकाचे मनोगत स्वगत असते. त्यामुळे त्या घटनांचे तो तन्मयतेने वर्णन करतो. पण ते वर्णन सत्याला धरून असावे. म्हणजेच त्याने घडलेल्या घटनांशी इमान राखले पाहिजे. मेर्ढेकरांनी म्हटल्या प्रमाणे, ''आत्मनिष्ठा हा वाङ्मयनिर्मितीचा आद्यबिंदू तर आहेच आहे, पण त्याहीपेक्षा अधिक म्हणजे आत्मनिष्ठेतच वाङ्मयनिर्मितीची परिणती आहे. वाङ्मयनिर्मितीची सुरुवात ज्याप्रमाणे 'आत्मनिष्ठेपासून' व्हावयास पाहिजे तसा लेखकाला कठोर आत्मपरीक्षण करता आले पाहिजे. तादात्म्याबरोबरच तटस्थ वृत्तीही धारण करता आली पाहिजे. आत्मचरित्रलेखनाचा हा विशेष अ. ना. देशपांडे यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

'आत्मचरित्रनिवेदन' म्हणजे तारेवरची कसरत. आत्मश्लाघेचा व आत्मसमर्थनाचा आपल्यावर आरोप येणार नाही, याबद्दल पदोपदी दक्षता बाळगायची आणि त्याचबरोबर जास्तीत जास्त अलिप्तवृत्ती स्वीकारून आपल्या स्वभावविशेषांचे गुणदोषांचे आणि कर्तृत्त्वाचे यथातथ्य दर्शन घडवून देण्याची खटपट करावयाची, असे दुहेरी धोरण आत्मचरित्रकाराला सांभाळावे लागते. [२]

जीवनाचे यथातथ्य दर्शन घडविण्यासाठी लेखकामध्ये सत्यप्रेम व प्रामाणिकपणा हवा 'नामूलं लिख्यते किंचित्' हे त्याचे ब्रीदवाक्य असले पाहिले. सत्यलेखनाने आपल्या व्यक्मित्त्वाची हानी होईल असा विचार मनात येऊन असत्यलेखनाचा मोह त्याला होता काम नये. श्रीमती गोदावरी परुळेकर

आपल्या आत्मचरित्राबद्दल म्हणतात, 'जेव्हा माणूस जागा होतो' हे पुस्तक जे पाहिले, जे अनुभवले तेच शब्दांकित करायचे, या उद्देशाने लिहिल्यामुळे वस्तुस्थितीमुळे वेगळे काही लिहिण्याच्या मोह मला कधीच झाला नाही.[३]

वास्तुस्थितीशी इमान राखून केलेले आत्मनिवेदन हेच खरे बळ आहे. म्हणूनच महात्मा गांधींचे 'सत्याचे प्रयोग' व रूसोचे 'कन्फेशन्स' ही आत्मचरित्रे उच्च कोटीची ठरली आहेत. अर्थात हे सत्यदर्शन घडविताना प्रांजळपणा हवा, तसेच फाजील विनय नको की आत्मस्तुतीही नको. लेखकाने इतरांचे दोषदर्शन घडवू नये व आत्मप्रदर्शन वा आत्मगौरवाचा मोहही टाळावा.

'सत्यदर्शन' हे आत्मचरित्राचे प्रमुख, वैशिष्ट्य असले तरी संपूर्ण सत्याचे दर्शन घडविणे हे अत्यंत असे कार्य आहे. आपल्या जीवनातील काही गोष्टी आत्मचरित्रकार विसरतो, तर काही अप्रिय घटनांचे त्याला बुध्द्याचे विस्मरण होते. आपली जीवनकथा हा कलेचा एक उत्तम नमुना व्हावा, या इच्छेतून तो काही कटू घटना वगळतो व कलात्मकतेसाठी तपशीलाची काटछाट करतो. अशा संक्षेपामुळे मुळे सत्याचे स्वरूप बदलण्याचा संभव असतो. म्हणूनच अत्यंत विश्वसनीय असे आत्मचरित्र लिहिले जाणे अत्यंत कठीण असते. डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये यांनीही आत्मचरित्राविषयी बोलताना एका मुलाखातीत हेच मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात, सत्य, संपूर्ण सत्य सांगावे, अशी आपली अपेक्षा असली तरी ते फार कठीण आहे. नांवनिशीवार उल्लेख, बदनामी, भावना दुखविणे इत्यादी मुळे अशक्य. " World Within World" मध्ये स्टीफन स्पेंडर फक्त त्याला वैशिष्ट्यपूर्ण वाटणाऱ्या गोष्टींचाच उल्लेख करतो. काही स्त्रियांची आत्मचरित्रे मोकळेपणाने लिहिली गेली आहेत. पण 'स्मृतिचित्रा' सारखी क्वचितच. आत्मचरित्राचे मूल्यमापन करू शकणार? धड फिक्शन नाही की धड सत्यही नाही अशीच आत्मचरित्रे मराठीत अधिक आहेत. [४]

आत्मचरित्रात कलात्मकता असली म्हणजे त्यात काही दोष असले तरी त्याचे विस्मरणच होते. या बाबतीत न. चिं. केळकर यांच्या 'गतगोष्टी' या आत्मचरित्राबद्दल अ.म.जोशी यांनी व्यक्त केलेला

अभिप्राय लक्षात घेण्याजोगा आहे. ते म्हणतात, 'ज्या ठिकाणी राजकाराणाच्या प्रांतात शिरले आहेत, त्या ठिकाणी त्यांची स्वत्वाची जाणीव उसळी मारून वर आल्यासारखी वाटते व शुध्द भावनेची जागा वासनेने घेतल्यासारखी वाटते. हा दोष जरी असला तरी भाषेचे व वर्णनाचे लालित्य, कथनातील खेळकरपणा, व आत्मपरीक्षणातील मार्मिकता इत्यादी गुणांमुळे केळकरांचे आत्मचरित्र कोणत्याही आत्मचरित्र वाङ्मयात महत्त्वाचे स्थान मिळवील यात शंका नाही' [५]

**५.२) भावनाविष्कार :–**

आत्मचरित्र म्हणजे लेखकाच्या जीवनात घडणाऱ्या घटनांचे निवेदन होय. या निवेदनात सत्यनिष्ठता, तटस्थता इत्यादी गुण असावे असे म्हटले जाते. त्यामुळे आत्मचरित्र लेखकावर अनेक बंधने पडतात. आणि त्याचे लेखन रुक्ष बनते. परंतु आत्मचरित्र हे केवळ निवेदनात्मकच असावे असे नाही, ते कलात्मक ही असावे लागते. ज्यामुळे त्या लेखनात सौंदर्य निर्माण होईल व वाचकांना त्यापासून आनंद मिळेल अशा प्रकारची सौंदर्यनिर्मिती करता आली पाहिजे. प्रसंगाचे वर्णन, त्यातील नाट्यमयता, प्रसंगांचा परस्पर संबंध, प्रसंगवर्णनातील मार्मिकता, सुंदर भाषाशैली यासारख्या गुणांनी लेखक आत्मचरित्रात कलात्मकता निर्माण करू शकतो. ती कलात्मकता अपोआपच त्या लेखनातून निर्माण व्हावी त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न लेखकाने करू नयेत. प्रत्येक आत्मचरित्राचे लेखन 'स्वतंत्र' असावे. रुक्ष नसावे. लेखकाच्या जीवनातील घटनांनुसार त्याच्या लेखनात विविध भावनांचा आविष्कार होऊ शकतो. आपल्या जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग उत्कटपणे सांगताना त्याच्या लेखनात भावसौंदर्य निर्माण होऊ शकते. उत्कटतेतून निर्माण होणारे भावसौंदर्य नसेल तर त्याचे लेखन रूक्ष निवेदन होईल. केवळ तपशिल होईल. त्याच्या लेखनात उत्कटता हवीच म्हणजे भावनात्मकता हवी ती निमार्ण करताना लेखकाला तारेवरची कसरत करावी लागते. कारण त्याचे लेखन अधिक भावनोत्कट झाले की, त्यातील सत्य थोडे शबलीत होते. याउलट, भावनेपासून अलिप्त राहून त्याने लेखन केले तर ते नीरस आत्मनिवेदन ठरले. याचा अर्थ आत्मचरित्रकाराने भावशील असावयास हरकत नाही, परंतू भावशरण असू नये. एक प्रकारचा संयम बाळगून सत्यकथनाच्या उद्दिष्टांचा विसर

पडू न देता उत्कटतेने लेखन केले तर त्यात भावसौंदर्य निर्माण होऊ शकते. विविध प्रकारच्या घटनानुसार विविध प्रकारच्या भावना आविष्कृत होतील व विविधतेचे सौंदर्य निर्माण होईल. विविध रसनिर्मिती ही वाचकांना नेहमीच आनंद देते. त्या दृष्टीने विविध भावनांचा आविष्कार होणे आवश्यक असते. घडलेल्या प्रसंगातच लेखकाला हा भावविलास दाखवावा लागतो तो लेखकाच्या जीवनाच्या स्वरूपावर अवलंबून असते.

**५.३) समाज दर्शन :-**

आत्मचरित्रात लेखकाने स्वतःच्या जीवनाचे चित्रण केलेले असले तरी म्हणजे व्यक्ती दर्शनाबरोबरच ती व्यक्ती ज्या कालखंडात राहते त्या कालखंडाचे ही दर्शन घडते याबाबत तेन या साहित्यिकाने ) 'Man is the Product of environment' असे म्हटले आहे ते खरे आहे. कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे केवळ स्वयंभू असत नाही. ते व्यक्तिमत्त्व सभोवतालच्या जीवनाचे संस्कार घेत असते. मनुष्य हा समाजजीवनाचा एक घटक असल्याने समाजजीवनाच्या क्रिया प्रतिक्रिया त्याच्या व्यक्तिमत्त्वावर व जीवनावर होत राहतात. मनुष्य कितीही आत्मकेंद्रित व एकलकोंडा असला तरी सभावेतालच्या जीवन प्रवाहापासून तो पूर्णतः अलिप्त राहू शकत नाही. सुप्रसिध्द साहित्यिक वि.वा. शिरवाडकर यांनी कलावंताचे व्यक्तिमत्त्व व जीवन या संदर्भात काढलेले उद्‌गार अर्थपूर्ण आहेत. त्यांनी म्हटले आहे, की " जीवनाच्या ज्या परिसरात आपण वावरतो त्यापासून साहित्य हे अलग काढता येईल, हे शक्य नाही. साहित्यिकाची प्रतिभा कितीही आकाशमार्गी असली तरी त्याचे पाय नव्हे, त्याचं सारचं जीवन पृथ्वीवर टेकलेलं असतं. लेखकाचं व्यक्तिव हे त्याच्या वाङ्मयाचं अधिष्टान असतं हे कोणीच नाकारत नाही परंतु, हे व्यक्तित्वसुध्दा, सामान्यतः मानलं जातं तितकं स्वयंत्र आणि स्वतंत्र असत नाही. परिसरातील परिस्थितीचे नानाविध संस्कार त्याच्यावर होत असतात. व त्या क्रिया प्रतिक्रियातून त्याला विशिष्ट आकार, विशिष्ट रंग प्राप्त होतो," [६] हे विधान सर्वांनाच लागू पडणारे आहे. याचाच अर्थ कोणत्याही वाङ्मयीन कलाकृतीमध्ये त्या कृतीच्या लेखकाचे प्रतिबिंब उमटलेले असते. त्याप्रमाणे त्या

व्यक्तीच्या संभोवतालच्या समाजाचेही प्रतिबिंब उमटलेले असते. निदान आत्मचरित्राच्या बाबतीत हे अधिक खरे आहे. लेखकाचा जो नवीन कलखंड असेल त्या कालखंडातील कौटुंबिक जीवन धर्मजीवन, चालीरीती, रूढी परंपरा, अशा विविध सामाजिक प्रवृत्तींचे प्रतिबिंब आपोआपच आत्मचरित्रात व्यक्त होते. परंतू याचा अर्थ असा नव्हे की, आपल्या कालखंडातील समाजजीवनाचे दर्शन घडविण्यासाठी लेखक आत्मचरित्र लिहीत असतो, त्यादृष्टीने आत्मचरित्र लिहिले तर त्यात आत्मचरित्र कमी व इतिहास अधिक होईल व आत्मचरित्राला झळ पोहोचेल. आचार्य अत्र्यांच्या 'मी कसा झालो?' मध्ये जीवन घटनांना व व्यक्तिदर्शनाला महत्त्व मिळाले आहे. परंतू तेच कऱ्हेचे पाणी या आत्मचरित्रामध्ये महाराष्ट्राचा गेल्या पन्नास वर्षांचा राजकीय सामाजिक व वाङ्मयीन इतिहास वाचकांपुढे ठेवण्याचा संकल्प करून त्यांनी आत्मचरित्राच्या कलात्मकतेला बाधा आणिली आहे. असाच प्रकार वि.द.घाटे यांच्या दिवस असे होते' या आत्मचरित्रातही आढळतो. म्हणून आत्मचरित्रात येणारे समाजदर्शन हे सहजतेने व पार्श्वभूमीसारखे यावे, हे अधिक उचित होय. तथापि कमी अधिक प्रमाणात आत्मचरित्रात समाजदर्शन घडत असल्याने त्या दृष्टीनेही आत्मचरित्राचा अभ्यास होऊ शकेल.

**५.४) व्यक्तिचित्रण :–**

आत्मचरित्र्य ही एक जीवनकथा असते. हे खरे असले, तरी ती एक चरित्रकथा असते. स्वतः लेखकाच्याच जीवनाचे ते एक चित्र असते. त्यामुळे आत्मचरित्रात लेखकाच्या व्यक्मित्त्वाची अनेक गुणेवैशिट्ये व्यक्त होतात. लेखक स्वतःच आपल्या जीवनातील घटनांचे निवेदन करीत असल्यामुळे त्याचे अनुभव आशा–आकांक्षा सुखदुःख, रागलोभ, जीवनदृष्टिकोन अशा अनेक गुणधर्मांचे प्रतिबिंब उमटून त्या लेखकाची एक प्रतिमा तयार होते. आत्मचरित्रातील कथेत महत्त्व असते, ते या व्यक्तिमत्त्वलाच. त्यामुळे अशा प्रश्न निर्माण होईल की आत्मचरित्रात घटना महत्त्वाच्या की व्यक्तित्व महत्त्वाचे? कोणत्याही कथेत प्राधान्य हे घटनेला द्यायचे की व्यक्तित्वाला या विषयी परस्पर विरोधी विधाने करण्यात येतात. उदाहरणार्थ, घटनांमुळे व्यक्तित्वबनते. (Plot creats the charac-

ter) या उलट व्यक्तित्व घटना निर्माण करते. (Character Creates the plot) वास्तविक पाहता घटना या स्वभावामुळेच निर्माण होतात. ॲरिस्टॉटलच्या शोकांतिकेवर विचार मांडताना एस्.एस्. बुचर याने म्हटले आहे.

" The action is the product of the character and of the circumstances in which they are placed," शोकनाट्या संबंधीचे हे विधान जीवनसही लागू पडते. व्यक्तीच्या स्वभावामुळेच जीवनात विविध प्रकारच्या घटना घडत असतात. अर्थात घटनांचा त्या व्यक्तीच्या स्वभावावरही परिणाम होत असतो. परंतु त्या सर्वातून आपल्यासमोर उभे राहते ते व्यक्तीच्या स्वभावामुळेच जीवनात विविध प्रकारच्या घटना घडत असतात. अर्थात घटनांचा त्या व्यक्तीच्या स्वभावावर परीणाम होत असतो. परतुं त्या सर्वातून आपल्यासमोर उभे राहते ते व्यक्तितत्त्व त्यामुळे आत्मचरित्रातील जीवनदर्शनापेक्षा त्यातील व्यक्तिदर्शन हे सर्वात अधिक महत्त्वाचे असते. यासंबंधी " ग्रथकाराचे चरित्र म्हटले तरी त्याचा प्रमुख हेतू व्यक्तिचित्रण हाच असावयास पाहिजे." हे प्रा.अ.म. जोशी यांचे विधान समर्पक वाटते. [७]

लेखक स्वतःची व इतरांची व्यक्तिचित्रे परिणामकारकरीत्या रंगवू शकतो. या दृष्टीने पाहता चरित्राच्या संदर्भात सिडने ली याने ' A truthful Transmission of personality' म्हणजे व्यक्तित्वाचे सत्यपूर्ण चित्रण हा चरित्राचा जो हेतू सांगितला आहे, तो आत्मचरित्राच्या बाबतीतही खरा ठरतो.

आत्मचरित्रातील व्यक्तिदर्शनातला अनेक पात्रे असली तरी स्वतःलेखक हा त्या जीवन कथेचा नायक असतो. ती पात्रे त्याच जीवन घडविणारी असतात. अशा व्यक्तित्वाचा आत्मचरित्रकाराने वेध घेतलेला असतो. ही पात्रे जशी स्वतंत्र असतात, तशी आत्मचरित्रातील 'मी' शी संबंधित असतात. 'मी' च्या एका मोठ्या वर्तुळात सामावलेली ही छोटी छोटी वर्तुळे असतात. ही वर्तुळे परस्परांमध्ये गुतलेली असल्याने त्या मोठ्या मोठ्या वर्तुळात एक 'गुंतावळ' निर्माण होते. म्हणून डॉ. सदा कऱ्हडे यांनी

म्हटले आहे, " आत्मचरित्र हे केवळ 'स्व' भोवतीच केंद्रित असू शकत नाही. 'स्व' भोवती असणारे आप्तेष्ठ जिवलग मित्र, संख्यसंबंधी आणि हितशत्रु यांची देखिल त्यात गुंतवणूक असते. " [८]

आत्मचरित्रात लेखक जेव्हा दुसऱ्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतो. तेव्हा तो 'स्व' ला पूर्णपणे अलिप्त ठेऊ शकत नाही. ही व्यक्तिचित्रे लेखकाच्या दृष्टिकोनातून रेखाटलेली असल्याने ती मर्यादित असतात. आत्मचरित्राचा अभ्यास करताना हे गृहीत धरुनच लेखकाने स्वतःचा व इतरांचा व्यक्तिवेध कसा घेतला हे पाहणे योग्य ठरेल.

## ६) आत्मचरित्र लेखनाचे हेतू :–

आत्मचरित्र, हा अत्यंत वास्तववादी असा वाङ्मयप्रकार आहे. लघुकथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्रात्मक कदंबरी या सर्व वाङ्मयप्रकारांपेक्षा आत्मचरित्र अधिक वास्तव असते. मानवी जीवनाचा आणि लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा इतका प्रगट आणि वास्तव आविष्कार दुसरा कोणताच असू शकणार नाही. अशा या वाङ्मयप्रकाराच्या लेखनामागील हेतू काय काय असू शकतील याचा अभ्यास करणे उद्‌बोधक ठरेल. आत्मचरित्र लेखनाचे हेतू पुढीलप्रमाणे सांगितलेले आढळतात.

### ६.१) आपल्या विचार भावना यांना वाट करून देणे.

मानवी स्वभावाचे वैशिष्टय असे की, त्यात कोणताही विचार अथवा कोणतीही भावना सुखाची अगर दुःखाची आनंदाची ही फार काळ पडून राहू शकत नाही. आपल्या मनातील विचार – भावनांची वाट करून दिल्याने प्रत्येकाला बरे वाटत असते. त्यातून आपल्या विचार – भावनांशी ऐकणारा त्यात वाटेकरी झाला याचा आनंद माणसाला निश्चितच होत असतो. हे सारे सांगणे ज्यांना शक्य नाही अशांनी आपली जीवनकथा लिहून हा आनंद मिळवला. उदा.:– भाई माधवराव बागल यांना प्रश्न विचारला की, 'हे आत्मचरित्र कां लिहलं. ? ' तेव्हा ते म्हणतात, 'मला लिहावस वाटू लागलं म्हणून मी लिहलं. मला त्यात आनंद वाटू लागला लीहताना मी आनंद भोगू शकलो, म्हणून मी लिहलं आणि म्हणूनच मी लिहू शकलो. ' त्यातून त्याचा आत्मचरित्र लेखनाचा हेतू स्पष्ट होतो. उत्कट इच्छेतून

उत्स्फूर्तपणे जेव्हा असे आत्मचरित्राचे लेखन होते तेव्हा ते आपोआपच कलात्मक बनते. पण हे सर्वांनाच जमेल असे नाही. ज्याप्रमाणे भावगीत लिहणे सर्वांना जमेलच असे नाही तसे आत्मचरित्राचे आहे. म्हणून आत्मचरित्रातून लेखक आपल्या मनातील विचार – भावना यांना वाट करून देत असतो.

**६.२) बोध :–**

आपल्या जीवनातील अनुभवांपासून इतरांनी काही बोध घ्यावा असाही हेतू आत्मचरित्राच्या लेखनामागे काहींनी ठेवलेला दिसून येतो. आपल्या 'आत्मवृतात' श्री. कृ. कोल्हटकर म्हणतात, 'माझ्या चरित्रांपासून जर एखादा धडा शिकण्यासारखा असेल, तर तो हाच होय की अगदी सामान्य प्रतीच्या मनुष्याने आपल्या सामर्थ्यापलिकडचे काम अंगावर घेऊन त्याजकडे आपले शक्तीसर्वस्व लावले तर त्यात त्याला यश मिळणे कठीण नाही.

आपल्या मनातील असाच हेतू संत वाङ्मयाचे अभ्यासक ल. रा. पांगारकर यांनी 'चरित्रचंद्रा' च्या प्रस्तावनेत पुढील प्रमाणे मांडला आहे. " माझ्या चरित्रात कोणास काही घेण्यासारखे नाही असे मला वाटते, तर हे चरित्र लिहून प्रसिध्द करण्याचा उद्योग मी केला नसता. दारिद्ययात वाढलेल्या पण डोके वर काढू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास काही भरीव वाङ्मयकार्य किंवा धर्मकार्य करू पाहणाऱ्या लेखकास व वक्त्यास परमार्थाची तळमळ वाहणाऱ्या मुमुक्षूस, संसार सुखमय करावा अशी वासना असणाऱ्या सांसारिकास, या चरित्रापासून काही तरी बोध, आनंद व उत्साह मिळेल असा मला भरवसा वाटतो."

जीवनातील असामान्य प्रसंगांना तोंड देणारी सामान्य माणसेही आपल्या कुटुंबियांना आणि प्रियजनांना मार्गदर्शन व्हावे म्हणून आत्मचरित्राचे लेखन करताना आढळतात. 'आमचा जीवनप्रवास' च्या प्रस्तावनेत यशोदाबाई जोशी यांनी 'माझ्या कुंटूबीयांना हे लिखाण मनोरंजक व मार्गदर्शक ठरेल, अशी आशा व्यक्त केली आहे. 'संसारात राहून स्वशक्त्य नुसार पुष्कळ उच्च ध्येय कोणालाही साधता येईल. हे मात्र आमच्या गोष्टीवरून दिसून येईल' असे त्यापुढे म्हणतात आपल्या घराण्याचे आध्यात्मिक धोरण भक्कम ठेवण्यास आपले आत्मचरित्र मार्गदर्शक होईल, असेही त्यांनी सांगितले आहे. 'एका जीवनाचे उत्क्रमण

कसकसे होत गेले' याची कल्पना देण्यासाठी आपण आत्मचरित्र लिहिले असे महर्षी धों. के. कर्वे यांनी म्हटले आहे. आत्मचरित्रामागील बोध हा हेतू काही अशीच मान्य करता येईल. पण केवळ बोधासाठीच जर कुणी आत्मचरित्र लिहू लागला तर त्यांच्या लेखनात कलात्मकतेपेक्षा उपदेश येण्याचीच अधिक शक्यता आहे. तो बोध त्यातून सहज झालेला असावा, तरच आत्मचरित्रातील बोध हा हेतू स्पष्ट होईल.

**६.३) आठवणींची उजळणी :–**

गतकाळातील आठवणींची उजळणी करण्याची इच्छा प्रत्येक माणसाच्या ठिकाणी असते. आयुष्यातील काही विशिष्ट टप्पा ओलांडल्यानंतर शेवटी माणूस अशा ठिकाणी येऊन पोहोचतो की, त्यावेळी थोडे थांबून त्याला आपल्या गतजीवनाकडे वळून बघावेस वाटते. अशा वेळी आपल्या गतस्मृतींचे गाठोडे सोडून तो बसतो आणि त्या आठवणींना उजाळा देण्यात त्याला काही वेगळाच आनंद मिळतो. 'एका पथिकाची जीवनयात्रा' लिहिताना मो. वा. जोशी म्हणतात, "स्वतःचेच संपूर्ण आयुष्य स्वतःच अवलोकन करताना त्यात मन गढून गेल्याशिवाय कसे राहील? आपल्या आयुष्यातील सुखाचे व दुःखाचे आणि प्रेमाचे व कठोरपणाचे सर्व प्रसंग पुन्हा माझ्या दृष्टीस पडले आणि त्या मृत्युलोकाच्या प्रवासात मला जे अनेक सोबती मिळाले, त्या सर्वांची पुन्हा एकदा भेट झाली हा लाभ काय थोडा आहे? " 'स्मृतिचित्रे', 'गतगोष्टी', 'स्मरणकथा', 'स्मरणसाखळी', ही आत्मचरित्रे याची चांगलीच उदाहरणे आहेत'.

आयुष्याच्या शेवटी आपल्या चुका जनताजनार्दनासमोर कबूल करताना लेखकास एक प्रकारचे समाधान आणि धारिष्ट्य प्राप्त होत असते म्हणूनच रूसो या फ्रेंच लेखकांने आपल्या आत्मचरित्र्याला Confession असे नांव दिले आहे. पण जीवनात घडलेल्या सर्वच गोष्टी आत्मचरित्रात सांगितल्या पाहिजे असे मात्र नाही. त्या तशाच निवेदन केल्यानंतर त्यात कलात्मकता येणार नाही. व. शां. देसाई म्हणतात, 'आत्मवृत्त म्हणजे एखाद्या ख्रिस्ती माणसांने धर्मगुरूसमोर दिलेला कबुली जबाब नव्हे.' गत गोष्टीतील घटना मात्र सत्य असल्यापाहिजेत.

गत काळातील आठवणींना उजाळा देण्याचा अनुभव सुखद असल्याचे उल्लेख अनेकांच्या लेखनातून

आढळतात . गिबन म्हणतो , 'इतिहास लेखकाचे कार्य संपूर्ण झाल्यामुळे अता रिकाम्यावेळात गतायुष्यावर एकदा दृष्टी टाकण्याची मला इच्छा होत आह. तसे करण्यात स्वतःच्या मनाचे समाधान हा एकच हेतू आहे व तेच माझे फळ होय.

थोडा काळ, का होईना पण गतगोष्टीत स्मृतिरूपाने रहायला मिळावे असा आपले आत्मचरित्र लिहण्याची हेतू नटवर्य मामासाहेब बोडस यांनी सांगितला आहे.

जीवनाच्या प्रवासात पूर्वी भेटलेल्या सोबत्यांची पुन्हा एकदा आवलोकनात भेट होते. त्यात पुर्नमीलनाचा आनंद असतो. त्या व्यक्तीनी प्रसंगाना नवी झळाळा मिळते. त्यामुळे होणारा आनंद काही वेगळाच असतो. या आनंदासोबतच स्वस्थपणे चिंतन करण्याची संधीही लेखकाला मिळते. या दृष्टीने श्रीमती यशोदाबाई जोशी यांनी आमचा जीवन प्रवास या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत केलेला उल्लेख पाहण्या सारखा आहे. त्या म्हणतात, 'आपली जीवन यात्रा म्हणजे हिमालयापर्यंत चढण्या सारखा आहे, असे माझ्या मनाला वाटत आहे. या प्रवासात कितीतरी संकटे, दऱ्या खोरी, नद्या वगैरेंना तोंड देऊन वाट काढावी लागते, पण आता माझे पोहचण्याचे शिखर जवळ आहे. पाय जडभारी झाले आहेत. म्हणून मी थोडावेळ विश्रांती घेण्यासाठी निवाऱ्याची जागा पाहून तेथे अंमळ बसते, तेथे बसून मला माझ्या आयुष्याची स्वस्थपणे लांबवर दृष्टी टाकून पाहणी करता येईल.' आपल्या जीवनातील घटना आणि व्यक्ती यांनी प्राप्त झालेल्या आनंदात इतरांना सुद्धा सहभागी करून घ्यावे अशी इच्छा आत्मचरित्रकाराच्या मनात असते.

### ६.४) स्वकार्याचा प्रचार व आत्मसमर्थन :-

राजकीय, सामाजिक, साहित्यिक, कलाविषयक क्षेत्रांत वैशिष्टपूर्ण कार्य करणाऱ्या व्यक्ती, ज्यांनी जीवनात काही वेगळी वाट तुडविली काही इतरांपेक्षा वेगळे अनुभव अनुभवले अशा व्यक्तीच, आत्मचरित्र लेखनास प्रवृत्त होतात. त्यांचे कार्य आणि जीवन नेहमीच समाजासमोर असते. त्यांच्या गुणांनी जसे समाजाचे डोळे दिपतात तसे त्यांचे दोषही समाजाच्या नजरेत चटकन भरतात. अशा

व्यक्तींचे विचार आणि कार्य बहुधा समाजाच्या रूढ चाकोरी बाहेरचे किंवा वेगळे तरी असते. त्यामुळे समाजाच्या मनात अनेकदा त्यांच्याविषयी गैरसमजही असतात, याची जाणीव त्या व्यक्तींना नसते असे नाही. म्हणून स्वतःच्या कार्याचा प्रसार करण्यासाठी आणि समाजातील गैरसमज नष्ट करून आत्मसमर्थनार्थ त्या आत्मचरित्र लिहितात. अर्थातच वरील हेतूपेक्षा हे दोनही हेतू गौण असून आत्मचरित्राला कलात्मकदृष्ट्या त्यातून कमीपणाच येण्याची शक्यता अधिक असते.

महर्षी धों. के. कर्वे यांच्या आत्मचरित्राचा हेतू स्वतःचे उत्क्रमण कसे झाले हे दाखविण्याचा आहे. त्या सोबतच त्यांनी आपल्या स्त्री शिक्षणाच्या कार्याचा प्रचारही केला आहे. आपल्या आत्मचरित्राच्या उत्तरार्धात त्यांनी आपल्या संस्थेविषयीच बरीचशी माहिती दिली आहे. त्यामुळे या आत्मचरित्राला शेवटीशेवटी प्रचारकी रंग आला आहे.

हिटलर व मुसोलिनी या दोघांविषयी व त्यांच्या कार्याविषयी जगात खूप टीका झाली. समाजमनातील गैरसमजाचे निरसन व्हावे या हेतूने या दोघांनीही आपली आत्मचरित्रे लिहिली. हिटलरने 'माझा झगडा' या आत्मचरित्रात आपल्या विषयी जगातील गैरसमजांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या त्याने आपल्या पक्षाचा प्रचार आणि आत्मसमर्थनही केलेले दिसून येते. मुसालिनीनेही आपल्या हुकुमशाही धारणामुळे स्वतःवर टीका ओढवून घेतली आणि नंतर समर्थनार्थ आत्मचरित्र लिहिले. केळकरांच्या 'गतगोष्टीत' ही असेच आत्मसमर्थन पहावयास मिळते. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात पूर्वार्घ जसा तटस्थ वृत्तीने लिहिला तसा उत्तरार्थ त्यांनी लिहिला नाही.

आत्मचरित्रात हाती घेतलेल्या कार्याचा लेखकाने प्रचार करणे एक वेळ क्षम्य मानता येईल. पण त्याने आत्मसमर्थन करणे हे मात्र कधीही मान्य करता येणार नाही. अशा लेखनात आत्मसमर्थन आले की आत्मचरित्र लेखनाचा हेतूच संपला असे म्हणावे लागेल. आपण चांगले आहोत किंवा कसे, हे लेखकाने स्वतः सांगण्याची गरज नाही. त्याच्या जीवनातील प्रसंगातून आणि त्याच्या कृतीतून ते

आपोआप स्पष्ट होईल. त्याने त्या प्रमाणिकपणे सांगितल्या मात्र पाहिजेत.

या शिवाय आणखीकाही प्रयोजने आहेत. त्यांमध्ये आत्मचरित्र लेखनातून काही प्रकाशक पैशाचे आमिषादाखवून आत्मचरित्र लिहण्यास सांगतात. यात केवळ 'अर्थकृते' प्रयोजन असते. असे सनसनाटी लेखन 'थोडा काळ का होईना पण गाजते. आणि बराच पैसाही मिळवून देते. असे लेखन कलादृष्ट्या हिनकस ठरले तरी प्रकाशकांना त्याची फारशी चिंता नसते. या विषयी डॉ. नाईक म्हणतात. ' Thus the big people and ambitionus pyblishers becom prosperous' and happy at the expense of the art of autobiography.' त्यानंतर दुसरे दिमाखाचा हव्यास असणारे आत्मचरित्र लिहिणे. व ते प्रसिध्द होणे हा प्रतिष्ठेचाच एक भाग आहे अशी त्यांची समजूत असते त्यामुळे त्यांची स्वतः विषयीची माहिती ही कधीही सत्य आणि प्रांजळ असू शकणार नाही. त्यांच्या लेखनात स्वतः विषयी काही उवास्तव माहितही येते यात आत्मप्रगटनापेक्षा आत्मप्रदर्शनच अधिक असते. याशिवाय दडपणे आणि विकृती यामध्ये आत्मप्रगटीकरण एका विकृतीतून होत असल्याने त्यात कलाकृतीचा निर्भेळपणा येत नाही. व्देषवृत्ती व सूड बुध्दी काही माणसे मुळतच व्देष संकटवृत्तीने किंवा सूड बुद्धीने पछाडलेली असतात. ती आपल्या लेखनात इतराविषयी जिवके विषारी स्वरुपाचे लिहिता येईल तितके लिहितात. म्हणून अशी आत्मचरित्रे कलात्मक व उत्कट ठरत नाहीत.

आत्मचरित्र लेखनाचे वरील सर्व हेतू लक्षात घेता आपले अनुभव दुसऱ्यास सांगणे, जुन्या आठवणींची उजळणी हे दोन हेतू अधिक स्वाभाविक आणि मानवी वृत्तीला धरून वाटतात. या हेतूंनी लिहिलेल्या आत्मचरित्रात प्रमाणकिपणा हा अपोआपच येईल. निर्मळमनाने ते लिहिल्यामुळे त्यात उत्कटताही येईल व कलागुणांनी युक्त असे आत्मचरित्र वाचकाच्या मनावर निश्चितच परिणाम करील. बोधात्मक हेतूने आत्मचरित्रे लिहिली जातात. पण त्यात निखळ बोधापेक्षा आपल्या जीवनातले हे अनुभव कुणालाही उपयोगी ठरीते एवढीच भूमिका असेल, तर अशा आत्मचरित्रांचेही स्वागत केले पाहिजे. "पण फक्त

बोधासाठीच केलेले आत्मचरित्र लेखन हे कलादृष्ट्या हिनकस ठरते. राहवत नाही म्हणून आपली जीवनकहाणी सांगण्याची उत्कटता त्यात दिसावी. अशा उत्कट प्रसंग चित्रणातून आणि आत्मनिवेदनातून जर काही जीवनचिंतन आले, तर ते बोधापेक्षाही वरच्या पातळीवरचे ठरेल. खऱ्या आत्मचरित्रामागे आत्मप्रगटीकरणाची भूमिका असते. ते आत्मसमर्थन नसते." आत्मप्रर्शन तर मुळीच असू नये. हे आत्मप्रगटीकरण जितके प्रांजळ, उत्कट, तटस्थ तितकी आत्मचरित्राची उंची वाढत जाईल. जीवनात घटनांचे सत्यकथन आत्मलेखनात असतेच. पण जीवनानुभव घेतल्यानंतर एका समृध्द व्यक्तित्वाने आपले मनोगत त्यातून मांडलेले असते. मानवी जीवनाची ही कहाणी एका मानवानेच प्रांजळपणे सांगितली असल्यामुळे ती आपोआपच कलात्मक बनते.

**७) आत्मचरित्राच्या व्याख्या :–**

एका व्यक्तीने स्वतःच्याच आयुष्याचा लिहिलेला इतिहास म्हणजे 'आत्मचरित्र' अशी व्याख्या केली आहे. "लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वतःच्याच शब्दात सांगितलेली काहणी होय." स्वतःच्या आयुष्याबद्दल, त्यातील अनेक अनुभवाबद्दल, त्यातील अनेक अनुभवाबद्दल, मानापमानाच्या प्रसंगाबद्दल, त्याला जितके अधिक माहित असते तितके इतरांना असत नाही म्हणून चरित्रकारापेक्षाही आत्मचरित्रकार हा अधिक चांगल्या प्रकारे सत्य कथन करू शकतो. अशा ह्या आत्मचरित्र वाङ्मयप्रकाराच्या काही व्याख्या खालील प्रमाणे आहेत.

**☯ श्री. रा. ग. जाधव :–**

" आपल्या जीवनविषयक अनुभवांचे तदनुषगांने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वतःलेखकाने लेखनरुपाने घडविलेल दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय." [१]

**☯ डॉ. नाईक. डी. जी. :–**

"Autobiography in its simplest definition is the story of one's

life written by oneself " अशी आत्मचरित्राची व्याख्या 'Aspects of Autobiography' या आपल्या ग्रथांत केली आहे.

☯ **एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका :-**

"The account of an individual human life written by the subject himself."[११]

वरील दोन्ही व्याख्यांमध्ये लेखकाने स्वतःची कहाणी स्वतः सांगणे या गोष्टीवर अधिक भर दिला आहे.

☯ **डॉ. जॉन्सन :-**

" Every Man's life may be best written by himself." [१४]

☯ **कोलरिज :-**

" Any life however insignificant would, if truthfully told, be of interest." [१३]

☯ **डब्ल्यू. एच्. डन. :-**

" The true autobiography is but troso ('मस्तक व अवयवविरहीत मूर्ती) [१४]

प्रत्येक माणसाला स्वतःबद्दल सांगण्याची तीव्र इच्छा असते. आत्मप्रगटीकरण हा मनुष्याचा स्थायीभाव असतो या वृत्तीतूनच आत्मचरित्र जन्मास येते. आत्मचरित्र म्हणजे लिहिणाऱ्या लेखकाने आपल्या आयुष्यातील घटनांचे केलेले चित्रण होय. लेखकाच्या जीवनातील सुख-दुःखात्मक अनुभवांचा आत्मनिष्ठ भूमिकेतून पण वस्तुनिष्ठ पध्दतीने रेखाटलेला आलेख होय.

## संदर्भसूची

### प्रकरण पहिले


१) मर्ढेकर बा. सी. – ' सौंदर्य आणि साहित्य' मौजप्रकाशन तृतीय आवृत्ती १९७५ पृष्ठ १४६

२) देशपांडे अ. ना. – ' आधुनिक मराठी माङ्मयाचा इतिहास, 'भाग दुसरा व्हीनस प्रकाशन, पुणे आवृती पहिली १९५८ पृष्ठ – ५३.

३) परुळेकर गोदावरी – 'माझे आत्मचरित्र आणि मी' 'ललित' दिवाळी अंक नोव्हें – डिसें. १९८१ पृष्ठ ३८. ५१

४) डॉ. ग्रामोपाध्ये ग. ब. – 'आमचे समीक्षक' 'ललित' एप्रिल १९९९ पृष्ठ क्र ३८

५) जोशी अ. म. – 'चरित्र – आत्मचरित्र' 'स्नेहवर्धन' तृतिया आवृत्ती १७ एप्रिल १९९९ पृष्ठ क्र.१२१

६) शिरवाडकर वि. वा. – अध्यक्षीय भाषण
मुंबई उपनगर म. सा. संमेलन,
अधिवेशन चौदावे १९५६
वीणा, मे १९६४ पृष्ठ ३१

७) जोशी अ. म. – 'प्रदक्षिणा' 'चरित्रवाङ्मय'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०

पाचवी आवृत्ती १९७२ पृष्ठ १०९९

८) डॉ. कऱ्हाडे सदा – 'चरित्र आणि आत्मचरित्र' (साहित्यरूप)
लोकवाङ्मयगृह प्रा. लि. मुंबई,
प्रथमावृत्ती १९७६ पृष्ठ ९१.

९) मराठी विश्वकोश – खंड दुसरा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई –
प्रथम प्रकाशन १९७६ पृष्ठ ११.

१०) Dr. Nike D.G. Art of Atobiography, Vidarbh Marathwada Book Company, Poona First Published 1962,
Page No. 11.

११) Encyclopaedia Britannica, Vol.2 Encyclopaedia Britannica Ltd., William Benton,Publisher, London, 1963. Page 854.

१२) Maurois Andre - Aspects of Biography, Cambridge University press 1929Page 133.

१३) Wellek and Warren -
Theory of Literature, penguin Books, Third Edition Reprinted 1968 Page 75

१४) जोशी, अं. म. चरित्र – आत्मचरित्र
सुविचार प्रकाशन मंडळ प्रायव्हेट लिमिटेड नागपूर १९५६ पृष्ठ १०३.